# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

## Date – 07 March 2025

## Time 7.10 AM to 7.20 AM

## Language Marathi

## आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर

## प्रादेशिक बातम्या

## दिनांक ०७ मार्च २०२५ सकाळी ७.१० मि.

****

- यंदाचा जागतिक महिला दिन `नारी शक्ती सह विकसित भारत` या संकल्पनेवर साजरा करण्याचा केंद्र शासनाचा निर्णय
- तंत्रज्ञानाच्या योग्य वापरानं प्रशासनात पारदर्शकता येत असल्याचं मुख्यमंत्र्यांचं प्रतिपादन
- भैयाजी जोशी यांच्या मराठीसंदर्भातल्या विधानाचे विधीमंडळात तीव्र पडसाद
- जमीन महसूल संहिता सुधारणा विधेयक विधानसभेत मंजूर
- राज्यात बाईक टॅक्सी सेवेचा प्रस्ताव मंजुरीच्या अंतिम टप्प्यात

आणि

- मराठवाडा साहित्य परिषदेचे विशेष वाङ्मय पुरस्कार जाहीर–अजित दळवी यांना नटवर्य लोटू पाटील विशेष नाट्य पुरस्कार

****

यंदाचा जागतिक महिला दिन `नारी शक्ती सह विकसित भारत` या संकल्पनेवर आधारित साजरा करण्यात येणार आहे. केंद्रीय महिला आणि बालकल्याण मंत्री अन्नपूर्णा देवी यांनी काल याबाबत घोषणा केली. या निमित्ताने नवी दिल्ली इथं विज्ञान भवनात राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या उपस्थितीत एका परिसंवादाचं आयोजनही करण्यात आल्याचं त्यांनी सांगितलं. सरकार विविध धोरणं आणि योजनांच्या माध्यमातून महिला सबलीकरण आणि लिंगभाव समानतेसाठी काम करत असल्याचंही अन्नपूर्णा देवी यांनी म्हटलं आहे.

****

तंत्रज्ञानाच्या योग्य वापराने प्रशासनात पारदर्शकता येत असल्याचं प्रतिपादन, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केलं आहे. काल ठाण्यात, स्पेस टेक फॉर गुड गव्हर्नन्स या विषयावरच्या चर्चासत्रात ते बोलत होते. तंत्रज्ञानाचा योग्य वापर आपल्या कार्यक्षमतेतही वृद्धी करत असल्याचं, मुख्यमंत्र्यांनी नमूद केलं. ते म्हणाले.

**(बाईट – मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस)**

****

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे ज्येष्ठ नेते भैयाजी जोशी यांनी मराठीसंदर्भात केलेल्या विधानाचे तीव्र पडसाद काल विधीमंडळात उमटले. त्यावरून विधान परिषदेचं कामकाज वारंवार बाधित झालं. यासंदर्भात अनिल परब यांनी २८९ अन्वये चर्चेचा प्रस्ताव मांडला, तो सभापतींनी फेटाळून लावला, त्यावरून गदारोळ झाल्याने कामकाज दोन वेळा प्रत्येकी दहा मिनिटांसाठी स्थगित करण्यात आलं. कामकाज पुन्हा सुरू झाल्यावर भाई जगताप यांनी सभापतींच्या परवानगीने या विषयावर मत मांडत जोशी यांच्यावर कारवाईची मागणी केली.

विधानसभेत भास्कर जाधव यांनी हा मुद्दा उपस्थित केला. यावर बोलतांना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी, मुंबईसह सगळ्या महाराष्ट्राची आणि महाराष्ट्र शासनाची भाषा मराठीच असल्याचं सांगत, इथे राहणाऱ्या प्रत्येकाने मराठी भाषा शिकून घ्यावी, हीच शासनाची भूमिका असल्याचं सांगितलं.

आमदार आदित्य ठाकरे यांनी यासंदर्भात बोलतांना, जोशी यांनी माफी मागावी, असं म्हटलं तर माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी भैयाजी जोशी यांच्याविरोधात राजद्रोहाचा गुन्हा दाखल करावा, अशी मागणी केली.

**(बाईट – आदित्य ठाकरे आणि उद्धव ठाकरे)**

जोशी यांच्या या विधानाचा महाविकास आघाडीच्या नेत्यांनी हुतात्मा स्मारकाजवळ निषेध केला, तसंच हुतात्मा स्मारकाला अभिवादन करुन ही मुंबई तुटू देणार नसल्याची शपथ घेतली.

मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनीही जोशी यांच्या या विधानाबाबत तीव्र नाराजी व्यक्त केली.

****

दरम्यान, भैयाजी जोशी यांनी आपल्या विधानावरून गैरसमज झाल्याचं म्हटलं आहे. महाराष्ट्रात येणाऱ्या प्रत्येकाने मराठी भाषा शिकलीच पाहिजे, अशी आमची स्पष्ट भूमिका असल्याचा खुलासा, त्यांनी केला.

**(बाईट – भैय्याजी जोशी)**

****

राज्यात आर्थिक गुंतवणुकीच्या व्यवहारासाठी येणाऱ्या कंपन्या खऱ्या आहेत की फसव्या हे तपासण्यासाठी आणि भविष्यात टोरेस कंपनीसारखे आर्थिक गुन्हे होऊ नयेत यासाठी, महाराष्ट्र इंटेलिजेन्स युनिटची स्थापना करण्यात येणार असल्याची घोषणा गृह राज्यमंत्री योगेश कदम यांनी विधानपरिषदेत केली. टोरेस कंपनीकडून झालेल्या गुंतवणूकदारांच्या फसवणुकीबद्दल ते बोलत होते. या कंपनीनं १६ हजार ७८६ जणांची सुमारे अडीच हजार कोटी रुपयांची फसवणूक केली असून, ४९ कोटी २ लाख रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला असल्याची माहिती कदम यांनी दिली.

****

राज्यातल्या विविध विद्यापीठांची उपकेंद्रं स्थापन करण्याची व्यवहार्यता तपासण्यासाठी समिती स्थापन करण्यात आल्याचं, उच्च आणि तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी विधान परिषदेत सांगितलं.

शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या अन्य अडचणी सोडवण्यासाठी शालेय शिक्षण विभागाचं कामकाज जास्तीत जास्त ऑनलाईन करण्याचा प्रयत्न असल्याचं, शालेय शिक्षण मंत्री दादा भुसे यांनी सांगितलं. पवित्र पोर्टलच्या माध्यमातून शिक्षकांची कोणतीही चुकीची भर्ती झालेली नाही असंही त्यांनी स्पष्ट केलं.

तर शालेय स्तरावर कृषी अभ्यासक्रमाचा समावेश करण्याची मागणी, मराठवाडा पदवीधर मतदारसंघाचे आमदार सतीश चव्हाण यांनी केली.

****

महाराष्ट्र जमीन महसूल संहिता सुधारणा विधेयक २०२५ काल विधानसभेत एकमताने मंजूर झालं. महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी हे विधेयक सभागृहात मांडलं. या सुधारणेमुळे शासकीय थकबाकीपोटी लिलाव होऊन सरकारजमा झालेल्या पडीक जमिनी शेतकऱ्यांना परत मिळणार आहेत.

****

गाव आणि शहरात महिलांना तक्रार करता यावी यासाठी महिला भवन उभारावं, अशी मागणी, काँग्रेसचे आमदार अमित देशमुख यांनी काल विधानसभेत केली. महिलांना परिवहन विभागाच्या बसमध्ये मोफत प्रवासाची सुविधा द्यावी, मुख्यमंत्री

लाडकी बहीण योजनेच्या लाभार्थ्यांना अपात्र ठरवू नये, गर्भाशय मुखाच्या कर्करोगावरील लस मोफत उपलब्ध करावी, आदी मागण्याही देशमुख यांनी केल्या.

****

राज्यात बाईक टॅक्सी सेवा प्रस्ताव मंजुरीच्या अंतिम टप्प्यात असल्याची माहिति परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिली. विधान भवन परिसरात ते वार्ताहरांशी बोलत होते.

**(बाईट – परिवहनमंत्री प्रताप सरनाईक)**

****

मराठवाडा साहित्य परिषदेचे विशेष वाङ्मय पुरस्कार काल जाहीर झाले. जालना इथले अण्णा सावंत यांच्या फुलटायमर या आत्मचरित्राला, यशवंतराव चव्हाण विशेष वाङ्मय पुरस्कार जाहीर झाला असून, प्रसिद्ध नाटककार अजित दळवी यांना नटवर्य लोटू पाटील विशेष नाट्य पुरस्कार घोषित करण्यात आला आहे. २५ हजार रुपये आणि सन्मानचिन्ह असं या पुरस्काराचं स्वरूप आहे. येत्या २९ मार्चला छत्रपती संभाजीनगर इथं मसापच्या ना गो नांदापूरकर सभागृहात हे पुरस्कार समारंभपूर्वक प्रदान करण्यात येणार आहेत.

****

डॉ बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ आणि गोपीनाथराव मुंडे संशोधन संस्थेकडून छत्रपती संभाजीनगर इथल्या शेतमजुरांच्या सामाजिक, आर्थिक उन्नतीच्या प्रश्नांवर उपाय शोधण्यासाठी काल परिसंवाद घेण्यात आला. भारतीय किसान संघाचे संघटन मंत्री दिनेश कुलकर्णी यांनी यावेळी बोलताना, शेतीशी संबंधित लहान व्यवसायांना सुरक्षा प्रदान करणं आवश्यक असल्याचं नमूद केलं.

****

राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात मातृभाषेतून शिक्षणावर भर दिला जाणार आहे, मात्र एसएनडीटी विद्यापीठात फार आधीपासून इंग्रजी, मराठी, हिंदी, गुजराती या मातृभाषा असलेल्या विद्यार्थिनींना मातृभाषेतून परीक्षेची सुविधा असल्याचं, या विद्यापीठाच्या कुलगुरू उज्ज्वला चक्रदेव यांनी म्हटलं आहे. बीड इथं, ई–लँग्वेज लॅब, सायन्स लॅब आणि फॅशन डिझायनिंग क्रिएशन लॅबचं उद्घाटन चक्रदेव यांच्या हस्ते काल झालं, त्यावेळी त्या बोलत होत्या.

****

दुग्ध उत्पादन क्षेत्रात सर्वांनी पुढाकार घ्यावा, असं आवाहन खासदार डॉ. अजित गोपछडे यांनी केलं आहे. ते काल नांदेड इथं यासंदर्भातल्या एका कार्यशाळेत बोलत होते. सहकार क्षेत्रात सर्वांच्या हक्काचे रक्षण करत, पारदर्शकता महत्त्वाची असते, यातून एखाद्या जिल्ह्याचा कायापालट होऊ शकतो, असा विश्वास गोपछडे यांनी व्यक्त केला.

****

संतोष देशमुख हत्या प्रकरणाच्या निषेधार्थ काल जालना जिल्ह्यातल्या घनसावंगी आणि भोकरदन शहरात बंद पाळण्यात आला. घनसावंगी इथल्या सुतगिरणी चौकात रास्तारोको आंदोलन करण्यात आलं.

****

छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात सद्यस्थितीत ६१ हजार ७७ ब्रास वाळू उपलब्ध आहे. ही वाळू रितसर मागणी नोंदवून तसंच शुल्क भरुन उपलब्ध आहे. घरकुल लाभार्थ्यांना पाच ब्रास वाळू मोफत उपलब्ध असून, खरेदीसाठी ग्राहकास सेतु केंद्र किंवा इतर १४५ सुविधा केंद्रात जाऊन नोंदणी करणं आवश्यक असल्याचं जिल्हा खनिकर्म अधिकारी किशोर घोडके यांनी कळवलं आहे.

****